REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 8 | MAY - 2018

# नंदुरबार जिल्ह्यातील कृषी उत्पादकांच्या (शेतकरी) कृषी विपणनविषयक समस्या



**प्रा.के.बी.गिरासे**
**सहयोगी प्राध्यापक, जी.टी.पाटील महाविद्यालय, नंदुरबार.**

**सारांश :**

भारत एक कृषी प्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषीची महत्त्वपुर्ण भुमिका आहे.देशातील राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार, उपजीविका, भांडवल निर्मिती, परकीय व्यापार, उद्योग इ.मधील कृषीची भक्कम भुमिका नाकारता येणार नाही.कृषी क्षेत्र हे उद्योग क्षेत्रपेक्षा संपुर्णपणे वेगळे आहे.कृषीची राष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये प्रमुख भुमिका असुन कृषी ही एक जीवन जगण्याची पध्दत आहे. आणि ती सर्वसामान्यांची सर्वात महत्वाची उपजीविका आहे. कृषी हा नंदुरबार जिल्ह्यातील मुख्य आर्थिक व्यवसाय म्हणून गणला जातो.कृषी ही नंदुरबार जिल्ह्यातील जनतेचा उपजीविकेचा मुख्य आधार आहे जिल्ह्यातील ८० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबुन आहे.कृषी विपणनामध्ये कृषी वस्तु एकत्र करणे, साठवणे, प्रक्रिया करणे, वाहतुक करणे, पॅकिंग करणे, ग्रेडींग करणे आणि वितरण करणे यासारख्या उपक्रमांचा समावेश आहे.भारतात कृषी विक्रीच्या चार पध्दती आहेत.खेड्यात विक्री, मंडईमध्ये विक्री, बाजारात विक्री आणि सहकारी विपणन, देशातील सुमारे ६१.५ टक्के लोकसंख्या ही शेतीवर अवलंबुन आहे, तर सुमारे ५० टक्के कामगार शेतीत कार्यरत आहेत.कृषी हा औद्योगिकरणाचा पाया आहे.आज अनेक उद्योग शेतीवर अवलंबुन आहेत.नंदुरबार जिल्ह्यातील कृषी उत्पादकांना कृषी मालाच्या विपणन विषयक असलेल्या समस्या जाणुन घेण्यासाठी शोध निबंध तयार करण्यात आला आहे.

**बिजसंज्ञा :**

कृषी उत्पादक, कृषी विपणन, विपणन समस्या

## प्रस्ताविक:

कृषी विपणनात कृषी ते उपभोक्ता या दरम्यान कृषी उत्पादनाच्या हस्तांतरणासंबंधी ज्या प्रक्रिया पार पडल्या जातात त्यांचा समावेश होतो.कृषी विपणनात वाहतुकीचा खर्च, बाजारातील पायाभुत सुविधा, बाजार माहितीची कमतरता, प्रक्रिया युनिटची कमतरता, साठवण सुविधा, किंमतीतील चढ-उतार या सर्व प्रमुख बाबी आहेत. तसेच मध्यस्थांचे उच्चाटन करणे, पुरेशी साठवण सुविधा, सावकारांकडून स्वातंत्र्य, पुरेशी वाहतुक सुविधा आणि कर्ज व प्रशिक्षण सुविधा परिणामकारक कृषी विपणनासाठी हे उपाय आवश्यक आहेत. या सर्व बाबींमध्ये वाहतुक शुल्क ही एक महत्त्वपुर्ण समस्या आहे.शेतकऱ्यांच्या कृषी माल वाहतुकीसाठी करावा लागतो.यासाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याची गरज आहे जेणे करुन कृषी मालाच्या विपणनाची माहिती शेतकऱ्यांना मिळेल. कोणत्याही बाजारपेठेत मध्यस्थांची सेवा वापरणे बंधनकारक आहे.परंतु आज अशी परिस्थिती आहे की, त्यांना त्यांच्या सेवेपेक्षा अधिक लाभ मिळत आहेत जे चुकीचे आहे. या विषयावरील संशोधनातुन असे दिसून आले आहे की, ग्राहकांकडुन खर्च केलेल्या पैशांपैकी केवळ ४० ते ५० टक्के रक्कम शेतकऱ्यांना मिळते आणि उर्वरित ५० ते ६० टक्के बाजारपेठ खर्च आणि मध्यस्थांच्या फायद्यावर जातात. अनेक गावात अजुनही वाहतुक, गोदाम इत्यादी मूलभुत सेवांचा अभाव आहे आणि त्यात अनेक दोष आहेत.बहुतेक रस्ते हे कच्चे रस्ते आहेत जे मोटार वाहतुकीस अयोग्य आहेत.

## अभ्यासाची व्याप्ती :

नंदुरबार जिल्ह्यातील सहा कृषी उत्पन्न बाजार समितीत कृषी माल विक्री करण्यासाठी आलेल्या नमुना निवड शेतकऱ्यांना येणाऱ्या समस्याचाच अभ्यासात समावेश करण्यात आलेला आहे.तसेच विपणन समस्या विषयी उपाय सुचविण्यात आले आहेत.

**समस्या विधानः**

नंदुरबार जिल्ह्यातील अर्थव्यवस्था कृषी प्रधान असल्याने जिल्ह्यात कृषी विपणन महत्त्वाचे आहे.जिल्ह्यात अक्कलकुवा, धडगाव, नवापुर, नंदुरबार, शहादा व तळोदा अश्या सहा कृषी उत्पन्न बाजार समिती कृषी मालाच्या विपणनासाठी कार्यरत आहेत.तसेच शेतकऱ्यांच्या सोयीसाठी उपबाजार आवार आहेत. जिल्ह्यात अक्कलकुवा बाजार समिती अंतर्गत खापर, नवापुर बाजार समिती अंतर्गत चिंचपाडा, विसरवाडी व खांडबारा, नंदुरबार बाजार समिती अंतर्गत कोपर्ली व रनाळे व शहादा बाजार समिती अंतर्गत सारंगखेडा व मंदाणा इत्यादि ठिकाणी उपबाजार आवार आहेत. कृषी माल उत्पादनापासुन ते बाजार समित्यांमध्ये कृषी मालाच्या विक्रीपर्यंत अनेक समस्या येतात.याविषयी शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

१) शेतकऱ्यांच्या कृषी विपणन विषयक समस्या शोधणे
२) कार्यक्षम कृषी विपणनासाठी उपाय सुचविणे.

**संशोधन पध्दती :**

हा अभ्यास प्राथमिक माहिती आणि दुय्यम माहितीवर आधारित आहे.प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी संशोधकाने मुलाखतीचे वेळापत्रक तयार केले होते. प्राथमिक माहिती नंदुरबार जिल्ह्यातील धडगांव, अक्कलकुवा, नवापुर, नंदुरबार, शहादा व तळोदा या सहा कृषी उत्पन्न बाजार समितीत कृषी माल विक्रीसाठी आलेल्या शेतकऱ्यांची मुलाखत घेऊन व प्रश्नावलीच्या माध्यमाने माहिती गोळा करण्यात आली. यासाठी प्रत्येक बाजार समितीतील ३० याप्रमाणे सहा बाजार समितीतील एकूण ३०० शेतकऱ्यांकडून माहिती गोळा करण्यासाठी यादृच्छिक नमुना पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**माहितीचे विश्लेषण:**

मुलाखत व प्रश्नावलीव्दारे प्राप्त झालेल्या तथ्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

नमुना निवड शेतकऱ्यांना विचारण्यात आलेल्या प्रश्न आपण आपला कृषी माल विक्रीसाठी कोणत्या ठिकाणी प्राधान्य देतात.या प्रश्नाचे उत्तर नमुना निवड शेतकऱ्यांनी पुढीलप्रमाणे प्रतिसाद दिलेले आहे.

**सारणी : १**
**नमुना निवड शेतकऱ्यांचे कृषी माल विक्रीसाठी प्राधान्य**

| अ.क्र. | कृषी उत्पन्न बाजार समितीचे नाव | कृषी उत्पन्न बाजार समितीत | आठवडे बाजारात | गावात | इतर मार्गाने | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषी उत्पन्न बाजार समिती, अक्कलकुवा | ०४ | ३२ | ११ | ०३ | ५० |
| २ | कृषी उत्पन्न बाजार समिती, धडगांव | ०३ | ३४ | ०९ | ०४ | ५० |
| ३ | कृषी उत्पन्न बाजार समिती, नवापुर | ०५ | ३५ | ०६ | ०४ | ५० |
| ४ | कृषी उत्पन्न बाजार समिती, नंदुरबार | ४४ | ०२ | ०३ | ०१ | ५० |
| ५ | कृषी उत्पन्न बाजार समिती, शहादा | ४१ | ०६ | ०३ | ०० | ५० |
| ६ | कृषी उत्पन्न बाजार समिती, तळोदा | ४० | ०६ | ०३ | ०१ | ५० |
| **एकूण** | | **१३७** | **११५** | **३५** | **१३** | **३००** |

**स्त्रोत :**प्रश्नावलीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीवर आधारीत

सारणीवरुन असे निदर्शनास येते की, नंदुरबार जिल्ह्यातील सहा पैकी नवापुर, धडगांव व अक्कलकुवा या तीन बाजार समितीत आजही शेतकरी कृषी माल विक्रीस कृषी उत्पन्न बाजार समितीत प्राधान्य देत नसून आठवडे बाजारात कृषी माल विक्रीस प्राधान्य देतांना दिसून येतात.

कृषी माल घरापासुन कृषी उत्पन्न बाजार समिती पर्यंत वाहतुक करण्यासाठी कोणत्या वाहतुकीच्या साधनाचा उपयोग करता.प्रश्नावलीतील या प्रश्नाला नमुना निवड केलेल्या शेतकऱ्यांनी दिलेला प्रतिसाद सारणी क्र.२ मध्ये दर्शविलेला आहे.

**सारणी : २**

**कृषीमाल बाजार समितीत आणतांना वाहतूक साधनाचा उपयोग**

| अ.क्र. | शेतमाल वाहतूक साधनांचा प्रकार | नमूना निवड शेतकऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ट्रक | ५२ | १७.३३ |
| २ | ट्रॅक्टर | ९१ | ३०.३३ |
| ३ | बैलगाडी | १३४ | ४४.६७ |
| ४ | इतर | २३ | ७.६७ |
| | **एकूण** | **३००** | **१००.००** |

**स्त्रोत :**प्रश्नावलीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीवर आधारीत

साणी २ वरुन असे स्पष्ट होते की, आजही शेतकऱ्यांना कृषी मालाच्या विपणनासाठी वाहतुकीच्या व्यवस्थेची समस्या आहे.बहुसंख्य शेतकरी बैंलगाडीच्या सहाय्याने कृषी माल विक्रीसाठी आणतात.

वाहतुकीमुळे विपणन प्रक्रिया गतिशिल होते.शेतकऱ्यांना कृषी माल वाहतुकीसाठी रस्त्यांची व्यवस्था चांगली असेल तर कृषी मालाला किंमत असेल त्यावेळेस बाजार समितीत विक्रीस आणू शकतो. कृषी उत्पन्न बाजार समिती पर्यंत वाहतुक करण्यासाठी उपलब्ध रस्त्यांची व्यवस्था विषयी विचारले असता नमुना निवड केलेल्या शेतकऱ्यांकडून प्रश्नावलीवरुन व मुलाखतीवरुन प्राप्त झालेली माहिती सारणी क्र.३ मध्ये दर्शविलेली आहे.

**सारणी :३**

**कृषी माल बाजार समिती पर्यंत वाहतुकीसाठी रस्त्यांची व्यवस्था**

| अ.क्र. | रस्ते | नमूना निवड शेतकऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कच्चे | १९८ | ६६ |
| २ | पक्के | ५७ | १९ |
| ३ | अजिबाज नाहीत | ४५ | १५ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

**स्त्रोत** : प्रश्नावलीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीवर आधारीत

सारणीमध्ये दर्शवल्याप्रमाणे नमुना निवड केलेल्या ३०० शेतकऱ्यांपैकी १९८ (६६ टक्के) शेतकऱ्यांनी कृषी माल वाहतुकीसाठी कच्चे रस्ते असल्याचे सांगितले.प्रतिसाद देणाऱ्या या शेतकऱ्यांमध्ये धडगांव, तळोदा व अक्कलकुवा बाजार समितीतीत शेतकऱ्यांनी संख्या जास्त होती यावरुन निदर्शनास येते की, रस्त्यांची समस्या कृषी विपणनासाठी दूर होणे महत्त्वाचे आहे.

शेतकऱ्यांच्या निवासस्थाना पासुन बाजार समितीचे अंतर याचा जवळचा संबंध आहे.या दोहोत अंतर कमी असेल तर शेतकऱ्यांला कृषी माल वाहतुकीसाठी कृषी पदार्थाचा विपणनाचा कमी खर्च येतो.तसेच अंतर कमी असेल तर शेतकरी बाजार समितीत कृषी मालाची वाजवी किंमत असेल त्यावेळेस ताबडतोब विक्री करु शकतो.सारणी क्र.४ मध्ये नमुना निवड केलेल्या शेतकऱ्यांचे निवासस्थान आणि कृषी उत्पन्न बाजार समिती यामधील अंतर दर्शविलेले आहे.

**सारणी :४**

**नमुना निवड केलेल्या शेतकऱ्यांचे घरापासुन बाजार समितीचे अंतर**

| अ.क्र. | अंतर कि.मी. | शेतकऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ५ कि.मी. पर्यत | ७४ | २४.६७ |
| २ | ५ ते १० कि.मी. | ८१ | २७.०० |
| ३ | १० ते २० कि.मी. | १०२ | ३४.०० |
| ४ | २० कि.मी. पेक्षा जास्त | ४३ | १४.३३ |
| | **एकूण** | **३००** | **१००.००** |

**स्त्रोत** : प्रश्नावलीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीवर आधारीत

**सारणी :५**

**कृषी माल विक्री करतांना बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांकडून योग्य सहकार्य**

| अ.क्र. | तपशिल | नमुना निवड शेतकऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २६४ | ८८.०० |
| २ | नाही | ३६ | १२.०० |
| | **एकूण** | **३००** | **१००.००** |

**स्त्रोत** : प्रश्नावलीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीवर आधारीत

सारणी क्र.५ वरुन असे निदर्शनास येते की, कृषी माल विक्री करतांना कृषी उत्पन्न बाजार समितीतील कर्मचाऱ्यांकडून सहकार्य मिळते का? असे विचारले असता २६४ (८८.००) शेतकऱ्यांनी होय असे सांगितले तर ३६ (१२.००) शेतकऱ्यांनी नाही सांगितले. कर्मचाऱ्यांचे योग्य सहकार्य मिळते दर्शीविणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याने शेतकऱ्यांना कृषी माल विक्री करतांना सहकार्य मिळत असल्याने कोणतीही समस्या येत नाही असे सिध्द होते.

शेतमालाची गुणवत्ता तपासण्यासाठी आज अनेक अत्याधुनिक पध्दती उपलब्ध असतांनाही त्यांचा उपयोग बाजार समित्यामध्ये होतांना दिसत नाही.चुकीच्या पध्दतीमुळे दरही योग्य मिळत नाही.अशी ओरड नेहमी ऐकण्यात येते.एकाच गुणवत्तेचा आणि दर्जाचा कृषी मालाची किंमत ठरवतांना भेदभाव केला जातो काय?या प्रश्नाचे सत्य जाणून घेण्यासाठी नमुना निवड केलेल्या शेतकऱ्यांचे मत प्रश्नावली व मुलाखती वरुन जाणून घेतले असता मिळालेला प्रतिसाद सारणी क्र.६ मध्ये दर्शविलेला आहे.

**सारणी :६**

**एकाच गुणवत्तेचा आणि दर्जाचा कृषीमालाची किंमत ठरवतांना भेदभाव**

| अ.क्र. | तपशिल | नमुना शेतकऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १९७ | ६५.६७ |
| २ | सांगता येत नाही | ३६ | १२.०० |
| ३ | नाही | ६७ | २२.३३ |
| | **एकूण** | **३००** | **१००.००** |

**स्त्रोत** : प्रश्नावलीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीवर आधारीत

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियम व कायद्यानुसार कृषी मालाची विक्री केल्यानंतर २४ तासाच्या आत शेतकऱ्याला कृषी मालाची विक्री किंमत मिळण्याचा अधिकार आहे. नंदुरबार जिल्ह्यातील प्रत्येक कृषी उत्पन्न बाजार समिती क्षेत्रातील नमूना निवड केलेल्या शेतकऱ्यांकडून कृषी माल विक्रीची किंमत मिळण्याचा कालावधी माहित करुन घेतला असता मिळालेला प्रतिसाद सारणी क्रमांक ७ मध्ये दर्शविलेला आहे.

**सारणी :७**

**बाजार समितीत कृषी माल विक्रीची किंमत मिळण्याचा कालावधी**

| अ.क्र. | कृषी माल विक्री किंममत मिळण्याचा कालावधी | नमुना निवड शेतकऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कृषी माल विक्री नंतर ताबडतोब | १४९ | ४९.६७ |
| २ | २ ते ५ दिवस | ८२ | २७.३३ |
| ३ | ६ ते १० दिवस | ४१ | १३.६७ |
| ४ | ११ ते १५ दिवस | १८ | ६.०० |
| ५ | १५ दिवसापेक्षा जास्त | १० | ३.३३ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

**स्त्रोत -** प्रश्नावलीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीवर आधारीत

**सारणी :८**

**बाजार समितीत कृषीमाल विक्री करतांना शेतकऱ्यांना येणाऱ्या समस्या**

| अ.क्र. | समस्या | एकूण नमूना निवड शेतकऱ्यांपैकी प्रतिसाद देणारे शेतकरी |
|---|---|---|
| १ | कृषी मालाच्या किंमत विषयी योग्य माहिती दिली जात नाही | १९८ |
| २ | कृषी मालाची कमी किंमत दिली जाते | १५९ |
| ३ | वजन माप करण्यात दिरंगाई | १८८ |
| ४ | वजन मापात गैरप्रकार | १५५ |
| ५ | अवाजवी व्यापारी शुल्क | १६७ |
| ६ | कृषी मालाची किंमत मिळण्यास विलंब | १८६ |
| ७ | चोरी | ८१ |
| ८ | टिनशेड अभावी कृषीमाल ठेवण्यास अडचण | २०१ |
| ९ | कोणतीही अडचण येत नाही. | ७१ |

**स्त्रोत -**प्रश्नावलीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीवर आधारीत

## निष्कर्ष :

१) ग्रेडिंग युनिट व बाजार माहिती केंद्र शेतमाल विक्रेत्या शेतकऱ्यांसाठी त्यांच्या शेतमालाला वाजवी किंमत मिळावी यासाठी शेतमालाचे प्रतवारी व श्रेंनिकरण होणे आवश्यक असतांनाही ग्रेडिंग युनिटची सुविधा फक्त तळोदा बाजार समितीत व बाजार माहिती केंद्राची सुविधा फक्त नवापुर बाजार समितीत दिसून आली.

२) नमुना निवड शेतकऱ्यांचे निवासस्थानापासुन कृषी उत्पन्न बाजार समिती पर्यंत शेतमाल वाहून नेण्यासाठी शेतकऱ्यांनी रस्ते नसल्याचे शेतकऱ्यांना आनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

३) शेतकऱ्यांच्या शेतमालाचे श्रेंनिकरण व प्रतवारी बाजार समितीत होत नसल्याचे सांगितले.

४) नमुना निवड शेतकऱ्यांनी आपला प्रतिसाद नोंदवताना असे निदर्शनास आले की, शेतकऱ्यांनी बाजार समितीत शासनाने निश्चित केलेला हमी भाव मिळत नसल्याचे सांगितले.

५) शेतकऱ्यांने शेतमाल विक्री केल्यानंतर २४ तासाच्या आत शेतमाल विक्रीची किंमत शेतकऱ्यांला मिळाली पाहिजे. असा नियम असतांना जिल्ह्यातील सर्वच बाजार समितींमध्ये शेतकऱ्यांला शेतमाल विक्री किंमत ताबडतोब मिळण्यात सातत्य नाही.

६) फक्त तळोदा बाजार समितीत प्रतवारीची सोय आहे मात्र ती दोषपुर्ण दिसून येते. त्यामुळे शेतकऱ्यांना त्याच्या कृषी मालाची प्रतवारी होत नसल्याने योग्य किंमत प्राप्त होत नाही.

७) जिल्ह्यातील बाजार समित्यांचे अध्ययन केले असता असे दिसून येते की, नंदुरबार, शहादा व तळोदा बाजार समितींमध्ये सर्वात जास्त सोयी सुविधा असल्या तरी बऱ्याच सोयी सुविधा नाहीत. शेतकऱ्यांसाठी उपहारगृह फक्त नंदुरबार बाजार समितीत आहे तर शेतकरी निवास नवापुर, नंदुरबार व तळोदा या तीन बाजार समितींमध्ये आहे. नंदुरबार व तळोदा बाजार समितीत हंगामात माल ठेवण्यासाठी ओटे अपूर्ण पडतात. नवापुर बाजार समितीत सिमेंट ओटे नाहीत तर शहादा बाजार समिततीत लिलावासाठी खुली जागा नाही. जिल्ह्यात सहा बाजार समितींच्या तुलनेत धडगांव बाजार समितींमध्ये सर्वात कमी सोयी सुविधा आहेत.

८) शेतकऱ्यांच्या कृषी ममालाला योग्य किंमत मिळेपर्यंत साठवणुकीची बाजार समिती आवारात समितीचे आणि शासनाचे गोदामे असतात. या मालावर बँक कर्ज देते. परंतु जिल्ह्यात कृषी मालाच्या तारणावर कर्जाची सोय उपलब्ध नाही. जिल्ह्यातील बाजार समितींमध्ये शेतकऱ्यांचा कृषी माल गोदामात साठवणुकीसाठी पुरेशी गोदाम व्यवस्था नाही. शितगृहाची व्यवस्था एकही बाजार समितीत नसल्याचे अध्ययनात दिसून आले.

९) जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितींमध्ये शेतकऱ्यांना अनेक समस्या येतात शेतकऱ्यांना कृषी मालाच्या किंमत विषयी माहिती दिली जात नाही. कृषी मालाचे वजन माप करण्यात दिरंगाई होते गुणवत्ता असलेल्या कृषी मालाची कमी किंमत दिली जाते इत्यादी.

१०) व्यापारी संगनमत करुन कोणत्या प्रकारच्या कृषी मालाला जास्तीत जास्त किती किंमतीची बोली लावावी हे अगोदरच ठरवून लिलावास सुरवात करतात. ठरलेल्या बोलीपेक्षा व्यापारी जास्त बोली लावत नाहीत.

**संदर्भ :**


१) Acharya S.S. Agrawal N.L., Agricultural Marketing in India, Forth Edition, Oxford & IBH publishing Co.Pvt. Ltd., New Delhi.

२) Agrawal A.N. - Indian Agriculture, Vikas Publishing House Private Limited, New Delhi, १९८०.

३) Arya Anita - Agricultural Marketing in Gujrath, Concept Publishing Company, New Delhi, १९९३.

४) Dixit R.S. - Agricultural Marketing in India : The Cases of Regulated Agricultural Markets in Uttar Pradesh, Daya Publishing House, New Delhi, २००४.

५) Maharashtra State Agricultural Marketing Board, Pune.

६) निकम तानाजीराव, कृषी व्यवस्थापन व कृषी विपणन, अजिंक्यातारा पब्लिकेशन, मुंबई, २००१.

७) महाराष्ट्र राज्य कृषीपणन मंडळ, पुणे, वार्षिक अहवाल २०१२-१३.

८) महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम. १९६३.

९) नंदुरबार जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७-१८.

१०) अक्कलकुवा कृषी उत्पन्न बाजार समिती, वार्षिक अहवाल, २०१७-१८.

११) धडगांव कृषी उत्पन्न बाजार समिती, वार्षिक अहवाल, २०१७-१८.

१२) नवापुर कृषी उत्पन्न बाजार समिती, वार्षिक अहवाल, २०१७-१८.

१३) शहादा कृषी उत्पन्न बाजार समिती, वार्षिक अहवाल, २०१७-१८.

१४) तळोदा कृषी उत्पन्न बाजार समिती, वार्षिक अहवाल, २०१७-१८.